सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई -४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७३/४२४/४३४
e mail–desk4a@dtemaharashtra.gov.in,website: http://www.dtemaharashtra.gov.in

**परिपत्रक**

क्र. ४/आस्था/डॉ.जे.पी.ना.रा.शि.पु./२०२५/३९०

दि. 17 OCT 2025

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, छ. संभाजीनगर,
अमरावती व नागपूर

विषय : सन २०२४-२५ या वर्षासाठीच्या "डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार" प्रदान करण्याकरीता **निर्धारीत निकष व अटींची पुर्तता करणाऱ्या अध्यापकांनी माहिती सादर करणेबाबत...**

संदर्भ : १. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. पुरस्कार-२०२५/CN-१३१०६४२/ प्र.क्र.८९/समन्वय, दिनांक ०५ सप्टेंबर २०२५.
२. शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. क्र. पुरस्कार-२०२५/CN-१३१०६४२/ प्र.क्र.८९/समन्वय, दिनांक १६.१०.२०२५

संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये, शासनाने "आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार" या पुरस्कारास "डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार" असे नामांतर केले असून, सदर पुरस्काराच्या अटी, निकष व निवड प्रक्रियेत सुधारणा करून नवीन कार्यपद्धती अधिसूचित केली आहे. तसेच, सन २०२४-२५ या वर्षासाठीचा "डॉ. व्ही. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार" प्रदान करण्याकरीता निवड प्रक्रिया कार्यक्रम संदर्भ क्रमांक २ मधील शासन परिपत्रकान्वये निश्चित करण्यात आलेला आहे. सोबत संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णय व संदर्भ क्रमांक २ मधील शासन परिपत्रक संलग्न केलेले आहेत, त्यांचे अवलोकन करावे.

२. संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयानुसार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त खालीलप्रमाणे पुरस्कार निश्चित करण्यात आले आहेत -

I. राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये, स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालये, औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम संस्था (पदवी / पदव्युत्तर), डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे येथील ०२ शिक्षक.

II. राज्यातील शासकीय तंत्रनिकेतने, स्वायत्त तंत्रनिकेतने येथील शिक्षक तसेच औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम संस्था (पदविका) यामधील ०३ शिक्षक.

३. तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या पुरस्कारांच्या संख्येच्या मर्यादेत शिक्षकांची निवड करण्यासाठी शासन निर्णयात नमूद केलेल्या खालील प्राथमिक अटींची पूर्तता करणारे शिक्षक "डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार" यासाठी अर्ज करण्यास पात्र राहतील.

I. शासनाने विहित केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार नियुक्ती झालेले शिक्षक

II. शिक्षकाने नियमित वर्ग अध्यापनाचे कार्य केलेले असावे. अध्यापनाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रात प्रतिनियुक्तीवर गेलेले प्रतिनियुक्तीवर आहेत असे शिक्षक पुरस्कारासाठी अपात्र राहतील.

III. शिक्षकाने कमीत कमी १५ वर्षांची अध्यापन सेवा केलेली असावी.

IV. सेवानिवृत्त झालेले शिक्षक डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कारासाठी पात्र राहणार नाहीत.

V. विभागीय चौकशीत दोषी आढळलेले, विभागीय चौकशी प्रलंबित असलेले शिक्षक पुरस्कारासाठी अपात्र राहतील.

VI. शिक्षकाविरुद्ध फौजदारी कारवाईत शिक्षा झालेली नसावी, तसेच पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल नसावा.

VII. शिक्षक खाजगी शिकवणी करीत नसावा.

VIII. प्राथमिक अटीचा भंग झाल्यास, पुरस्कार व त्याअनुषंगिक सोयी-सुविधा परत घेण्यात येतील व संबंधितांवर उचित कारवाई करण्यात येईल.

४. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, त्यांनी संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णय त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शासकीय व अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये, स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालये, औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम संस्था (पदवी/पदव्युत्तर), डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे तसेच सर्व शासकीय तंत्रनिकेतने, स्वायत्त तंत्रनिकेतने व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम संस्था (पदविका) यांना अग्रेषित करावा. सदर शासन निर्णय संबंधित संस्था प्रमुखांनी त्यांच्या संस्थेतील प्राथमिक अटींची पूर्तता करणाऱ्या शिक्षकांच्या निदर्शनास आणून, संबंधित शिक्षकांकडून शासन निर्णयात नमूद केलेल्या आवश्यक कागदपत्रांसह व मूल्यांकनासाठी निर्धारीत निकषांनुसार अर्ज / प्रस्ताव दि. ०७.११.२०२५ पर्यंत प्राप्त करुन घेण्यास संबंधित संस्था प्रमूखांना आपले स्तरावरुन सूचित करावे. तसेच संस्था प्रमूखानी त्यांचेकडे प्राप्त झालेले अर्ज आपले कार्यालयास दि. ०८.११.२०२५ रोजी जमा करण्यास सूचित करावे.

५. परिच्छेद क्रमांक ४ नुसार प्राप्त झालेल्या शिक्षकांच्या अर्जातील / प्रस्तावातील माहितीची तपासणी करून, आपल्या विभागीय कार्यक्षेत्रातील सर्व शिक्षकांची संपूर्ण माहिती **सोबतच्या विवरणपत्रात** भरून माहितीच्या समर्थनार्थ समर्पक कागदपत्रांची सत्यप्रतीसह दि. १०.११.२०२५ रोजी निश्चितपणे या संचालनालयास द्विप्रतीत सादर करावी. विवरणपत्रातील माहिती "Sakal Marathi" या फॉन्टचा वापर करून Excel फाईल स्वरूपात तयार करून desk4@dtemaharashtra.gov.in या ई-मेलवर पाठवावी. संचालनालयास दि. १०.११.२०२५ नंतर प्राप्त झालेली माहिती विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सादर

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी -

१. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड
२. प्राचार्य / संचालक, सर्व शासकीय व अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये, शासकीय व शासन अनुदानित स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालये
३. प्राचार्य /संचालक, सर्व शासकीय व अनुदानित औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, स्वायत्त औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये
४. प्राचार्य, सर्व शासकीय तंत्रनिकेतने,औषधनिर्माण संस्था (पदविका)
५. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
६. कार्यासन क्रमांक ४अ, मुख्य कार्यालय, मुंबई
७. निवड नस्तीस

## विवरणपत्र

| अ.क्र. | अद्यापकाचे नाव , पदनाम, संस्था | जन्मदिनांक | शैक्षणिक अर्हता | नियमित नियुक्तीचा दिनांक, (शासन निर्णयासह) व एकूण सेवा<br>एकूण सेवपैकी अध्यापकीय सेवा कालावधी | परिविक्षा कालावधी पूर्ण केला आहे किंवा कसे ? (शासन निर्णयासह) | गोपनीय अहवालाची प्रतवारी / गुणांकन (सन २०२०-२१ ते सन २०२४-२५) | विभागीय चौकशी दोषी आढळले आहेत कां / विभागीय चौकशी सुरु आहे /प्रलंबित आहे / प्रस्तावित आहे याबाबतची माहिती | अद्यापकाविरुध्द फौजदारी कारवाईत शिक्षा झालेली आहे का ? तसेच पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झाला आहे का ? | संबधित शिक्षक खाजगी शिकवणी घेत आहे किंवा कसे ? |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | |

ठिकाण :

दिनांक :

## विवरणपत्र

| अ.क्र. | अध्यापकाचे नाव , पदनाम, संस्था | अध्यापन विषयात प्रसिध्द शोध निबंध | विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्या विकासाकरीता राबविलेले उपक्रम | अध्यापन विषयातील विद्यार्थ्यांच्या उत्तीर्णतेचे ५ वर्षातील वर्षनिहाय प्रमाण | पी.एच.डी. किंवा नेट-सेट उत्तीर्ण आहे किंवा कसे ? | किती विद्यार्थ्यांना पीएचडी मार्गदर्शक म्हणून काम केले | अध्यापन क्षेत्रामध्ये केलेले संशोधनपर कार्य, शोधनिबंध व त्याची प्रसिध्द याबाबत माहिती | आंतराष्ट्रीय / राष्ट्रीय सेतमनारमध्ये सादर / प्रसिध्द केलेले संशोधनपर पेपर्स | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| १ | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | |

ठिकाण :

दिनांक :

उपरोक्त शिक्षकांची माहितीची विभागीय कार्यालय स्तरावरुन संबंधित कागदपत्रे / दस्तावेजाच्या आधारे तपासणी करण्यात आली. त्यानुसार वरील माहिती अचूक असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

( )

सहसंचालक

तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

**विद्यापीठ / पारंपारिक व अभियांत्रिक महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि चित्रकला, उपयोजित कला येथील शिक्षकांना देण्यात येणारे "आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार" चे नांव "डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार" असे करणेबाबत व सदर पुरस्काराच्या अटी, निकष, निवड प्रक्रिया कार्यपद्धतीबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- पूरस्का- २०२५/CN-१३१०६४२/ प्र.क्र. ८९/समन्वय**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ५ सप्टेंबर, २०२५.

**संदर्भ-** १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक राशिपु-२०१२/(१३९/१२)/समन्वय, दि. २६/१२/२०१२.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक पुरस्का-२६१२/(प्र.क्र. १८२/१३) /समन्वय, दि. १६/२/२०२१५

**प्रस्तावना :-**

महाविद्यालयीन शिक्षण, विद्यापीठ शिक्षण, अभियांत्रिकी शिक्षण, चित्रकला /उपयोजित कला हया क्षेत्रात अध्ययन / अध्यापनासह शैक्षणिक क्षेत्रात समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या शिक्षकांचा यथोचित गौरव व्हावा, तसेच त्यांच्या कार्याची प्रेरणा इतर शिक्षकांना मिळावी या हेतूने राज्यातील शिक्षकांचा आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार देऊन, शासनाकडून सन्मान करण्यात येत होता.

कोल्हापूर जिल्हयातील बहिरेवाडी, ता. आजरा येथे ०५ सप्टेंबर, १९०७ रोजी जन्मलेल्या डॉ.जे.पी. नाईक यांच्या शैक्षणिक कार्याची दखल भारत सरकार बरोबरच अनेक देश आणि युनेस्कोनेदेखील घेतली आहे. त्यांच्या या योगदानाबद्दलची कृतज्ञ आठवण म्हणून महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत दरवर्षी ०५ सप्टेंबर शिक्षक दिनी बहुमोल शैक्षणिक योगदान देणारे प्राचार्य / शिक्षक यांना देण्यात येणारा आदर्श राज्य शिक्षक पुरस्काराचे नाव बदलण्यात येऊन **" डॉ. जे.पी नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार"** या नावाने पुरस्कार देण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

तसेच, आदर्श राज्य शिक्षक पुरस्काराकरीता शिक्षकाची होणारी निवड अधिक पारदर्शक आणि गुणवत्तापूर्वक व्हावी, खऱ्या अर्थाने समर्पित भावनेने शैक्षणिक क्षेत्रात अध्ययन अध्यापन करुन, मोलाचे योगदान देणाऱ्या शिक्षकांची निवड उक्त पुरस्काराकरीता व्हावी या करीता निवड प्रक्रियेच्या संदर्भात शासन निर्णय, दिनांक २६ डिसेंबर, २०१२ अन्वये, केलेल्या कार्यपद्धतीत सुधारणा करुन, अद्ययावत नियमावली प्रसिद्ध करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**<u>शासन निर्णय: -</u>**

१. सदर शासन निर्णयान्वये, आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार प्रदान करण्याच्या संदर्भात शासन निर्णय, दिनांक २६ डिसेंबर, २०१२ अधिक्रमित करण्यात येत असून, पुरस्काराचे निकष आणि कार्यपद्धती मध्ये सुधारणा करुन, सुधारित शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत दरवर्षी ०५ सप्टेंबर शिक्षक दिनी बहुमोल शैक्षणिक योगदान देणारे प्राचार्य / शिक्षक यांना देण्यात येणारा आदर्श राज्य शिक्षक पुरस्काराचे नाव **"डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार"** असे करण्यात येत आहे.

०३. डॉ. जे.पी नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कारांची एकूण संख्या ३१ राहील आणि त्याची विगतवारी खालीलप्रमाणे राहील

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>संचालनालय/विद्यापीठ नांव<br>(१)</th><th>पुरस्काराचे क्षेत्र<br>(२)</th><th>पुरस्कारांची संख्या<br>(३)</th></tr>
<tr><td>१.</td><td rowspan="2">उच्च शिक्षण संचालनालयाच्या कार्यकक्षेतील १२ अकृषि विद्यापीठे.<br><br>१) मुंबई विद्यापीठ<br>२) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे<br>३) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर<br>४) एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई.<br>५) पुण्यश्लोक अहिल्यादेवी सोलापूर विद्यापीठ, सोलापूर<br>६) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.<br>७) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.<br>८) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.<br>९) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड<br>१०) संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती<br>११) कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक<br>१२) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली</td><td>उच्च शिक्षण विभागाच्या अखत्यारित असलेल्या १२ विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील , शासकीय, अशासकीय अनुदानित, कायमविना अनुदानित महाविद्यालये/ संस्था/ अध्यापक महाविद्यालये/ समाजकार्य महाविद्यालये यांमधील प्राचार्य</td><td>प्रत्येक विद्यापीठाकरीता प्रत्येकी ०१ ( एकूण १२ )</td></tr>
<tr><td>२.</td><td>उच्च शिक्षण विभागाच्या अखत्यारित १२ विद्यापीठ परिक्षेत्र व कार्यकक्षेतील शासकीय, अशासकीय अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ संस्था/ अध्यापक महाविद्यालये/ समाजकार्य महाविद्यालये येथील शिक्षक</td><td>प्रत्येक विद्यापीठाकरीता प्रत्येकी ०१ (एकूण १२ )</td></tr>
<tr><td>३.</td><td>उच्च शिक्षण संचालनालय</td><td>राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासकीय शैक्षणिक संस्था, शासकीय अध्यापक महाविद्यालये येथील शिक्षक</td><td>०१</td></tr>
</table>

| अ.क्र. | संचालनालय/विद्यापीठ नांव (१) | पुरस्काराचे क्षेत्र (२) | पुरस्कारांची संख्या (३) |
|---|---|---|---|
| ४. | तंत्र शिक्षण संचालनालय | राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये, स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालये, औषधनिर्माण अभ्यासक्रम संस्था (पदवी /पदव्युत्तर), डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रविद्यापीठ, लोणेरे, यामधील अध्यापक येथील **शिक्षक** | ०२ |
| ५. | तंत्र शिक्षण संचालनालय | राज्यातील सर्व शासकीय तंत्रनिकेतने, स्वायत्त तंत्रनिकेतने येथील शिक्षक तसेच औषधनिर्माण अभ्यासक्रम संस्था (पदविका) यामधील **शिक्षक** | ०३ |
| ६. | कला शिक्षण (चित्रकला / उपयोजित कला) संचालनालय | राज्यातील शासकीय व अनुदानित चित्रकला /उपयोजित कला महाविद्यालये येथील **शिक्षक** | ०१ |
| | | एकूण:- | ३१ |

०४. पुरस्काराकरीता प्राथमिक अटी:

खालील अटी पूर्ण करणारे प्राचार्य /शिक्षक, डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कारासाठी अर्ज करण्यास / प्रस्ताव पाठविण्यास पात्र राहतील.

(एक) शासनाने विहीत केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार नियुक्ती झालेले शिक्षक.

(दोन) शिक्षकाने नियमित वर्ग अध्यापनाचे कार्य केलेले असावे. अध्यापनाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रात प्रतिनियुक्तीवर गेलेले प्रतिनियुक्तीवर आहेत असे शिक्षक पुरस्कारासाठी अपात्र राहतील. याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित संस्थेचे प्राचार्य / अधिष्ठाता / संचालक देतील.

(तीन) शिक्षकाने कमीत कमी १५ वर्षांची अध्यापन सेवा केलेली असावी, याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित संस्थेचे प्राचार्य / अधिष्ठाता / संचालक देतील.

(चार) डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक, पुनःश्च अशा पुरस्कारासाठी पात्र राहणार नाहीत. तसेच सेवानिवृत्त झालेले शिक्षक पात्र राहणार नाहीत. याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित संस्थेचे प्राचार्य / अधिष्ठाता / संचालक देतील.

(पाच) विभागीय चौकशीत दोषी आढळलेले, विभागीय चौकशी प्रलंबित असलेले शिक्षक पुरस्कारासाठी अपात्र राहतील. याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित संस्थेचे प्राचार्य / अधिष्ठाता संचालक देतील.

(सहा) शिक्षकाविरुद्ध फौजदारी कारवाईत शिक्षा झालेली नसावी, तसेच पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल नसावा. तसे प्रतिज्ञापत्र संबंधित शिक्षक देतील.

(सात) शिक्षक खाजगी शिकवणी करीत नसावा, तसे प्रतिज्ञापत्र संबंधित शिक्षक देतील.

(आठ) प्राथमिक अटीचा भंग झाल्यास, पुरस्कार व त्याअनुषंगिक सोयी-सुविधा परत घेण्यात येतील व संबंधितांवर उचित कारवाई करण्यात येईल.

(नऊ) प्राचार्यांच्या बाबतीत अर्ज करतेवेळी प्राचार्य उमेदवार यांची प्राचार्य पदावरील किमान सेवा ३ वर्ष पूर्ण असणे आवश्यक आहे.

०५. पुरस्कारार्थी निवड करण्याकरीता निकष :- परिच्छेद क्र.०४ येथे नमूद केलेल्या प्राथमिक अटी पूर्ण करणाऱ्या प्राचार्य/ शिक्षकांचेच प्रस्ताव, डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार निवडीसाठी विचारात घेण्यात येतील. त्याकरीता निकष खालीलप्रमाणे राहतील -

**(अ) प्राचार्य निवडीकरीता निकष, मुल्यांकन व गुणांकन.**

| अ.क्र. | निकष | मुल्यांकन पध्दती | गुणांकन |
|---|---|---|---|
| १ | महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत किती नवीन अभ्यासक्रम / विषय सुरु करण्यात आले. | याबाबतची कागदपत्रे संस्था अध्यक्ष/सचिव यांनी प्रमाणित करावी | ५ |
| २ | महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयातील किती अध्यापकांना / विद्यार्थ्यांना पी.एच. डी. साठी प्रोत्साहीत करण्यात आले. | याबाबतची कागदपत्रे संस्था अध्यक्ष/सचिव यांनी प्रमाणित करावी | ५ |
| ३ | महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयामार्फत राज्य / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील किती शैक्षणिक कार्यशाळा व चर्चासत्र आयोजित करण्यात आले | याबाबतची कागदपत्रे संस्था अध्यक्ष/सचिव यांनी प्रमाणित करावी | ५ |
| ४ | महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमा व्यतिरिक्त किती इतर उपक्रम राबविण्यात आले. | याबाबतची कागदपत्रे संस्था अध्यक्ष/सचिव यांनी प्रमाणित करावी | ५ |
| ५ | महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयास राज्यस्तर/राष्ट्रीय स्तरावरील किती पारितोषीके प्राप्त झाली | याबाबतची कागदपत्रे मा. कुलगुरु यांनी प्रमाणित करावी | ५ |
| ६ | महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत विविध फंडीग एजन्सी मार्फत देण्यात येणाऱ्या संशोधन अनुदान अंतर्गत महाविद्यालयामार्फत संशोधनाचे मोठे (Major) व लघु (Minor) स्वरुपाचे किती प्रकल्प तयार करण्यात आले आहेत/पूर्ण झाले आहेत/कार्यान्वित आहेत. | याबाबतची कागदपत्रे मा. कुलगुरु यांनी प्रमाणित करावी | ५ |
| ७ | महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा उचावण्यासाठी लॅबोरेटरीज, इंडस्ट्रीज, एन.जी.सी. व सामाजिक आणि शैक्षणिक संस्था व इतर यांच्यातील समन्वय Linkages साधण्यात आला आहे काय, | याबाबतची कागदपत्रे मा. कुलगुरु यांनी प्रमाणित करावी | ५ |

| अ.क्र. | निकष | मुल्यांकन पध्दती | गुणांकन |
|---|---|---|---|
| ८ | महाविद्यालयामध्ये प्राचार्याच्या कालावधीत महाविद्यालयामार्फत उच्च शिक्षण सुधारण्याबाबत कोणते नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले, अभ्यासक्रमात कमकुवत विद्यार्थ्यांसाठी विशेष योजनेबाबत प्रयत्न | याबाबतची कागदपत्रे मा. कुलगुरु यांनी प्रमाणित करावी | १० |
| ९ | महाविद्यालयामध्ये प्राचार्याच्या कालावधीत महाविद्यालयासाठी विद्यापीठ अनुदान आयोग (यु.जी.सी.) जिल्हा नियोजन व विकास समिती (डीपीडीसी) व इतर संस्थांकडून (शासकीय व अशासकीय) विविध योजनांकरिता किती अनुदान प्राप्त केले. | याबाबतची कागदपत्रे मा. कुलगुरु यांनी प्रमाणित करावी | ५ |
| १० | महाविद्यालयामध्ये प्राचार्याच्या कालावधीत महाविद्यालयामार्फत मागास, अल्पसंख्यांक व गरजू विद्यार्थ्यांसाठी कोणत्या विशेष योजना राबविण्यात आल्या. | याबाबतची कागदपत्रे मा. कुलगुरु यांनी प्रमाणित करावी | ५ |
| ११ | महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत प्रत्येक शैक्षणिक वर्षात संशोधन मार्गदर्शकांच्या (guide) माध्यमातून विविध विषयातील किती संशोधक शिष्यवृत्तीधारक (Research Scholar) तयार केले. | याबाबतची कागदपत्रे मा. कुलगुरु यांनी प्रमाणित करावी | ५ |
| १२ | महाविद्यालयामध्ये प्राचार्याच्या कालावधीत महाविद्यालयीन ग्रंथ खरेदीचा तपशील (प्रतिवर्ष किमान खरेदी मुल्य रु. ०१ लक्ष - १ गुण, ५० लक्ष - २ गुण, ७५ लक्ष-३ गुण, १०० लक्ष व त्यापेक्षा जास्त ५ गुण.) | याबाबतची कागदपत्रे संस्था अध्यक्ष/सचिव यांनी प्रमाणित करावी | ५ |
| १३ | महाविद्यालयामध्ये प्राचार्याच्या कालावधीत राष्ट्रीय /आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध विषयावरील परिषदांमध्ये शैक्षणिक वर्षात भाग घेतला आहे / नाही याचा तपशील (किमान २ परिषदा)<br>(२ परिषदा - २ गुण, ३ परिषदा-३ गुण, ३ पेक्षा जास्त असल्यास ५ गुण) | याबाबतची कागदपत्रे मा. कुलगुरु यांनी प्रमाणित करावी | ५ |
| १४ | महाविद्यालयामध्ये प्राचार्याच्या कालावधीत मागील तीन वर्षातील विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाण (वर्ष निहाय निकाल ८०% पेक्षा जास्त असणे आवश्यक) | याबाबतची कागदपत्रे मा. कुलगुरु यांनी प्रमाणित करावी | ५ |
| १५ | नॅक मुल्यांकन व पुनर्मुल्यांकन करण्याबाबत केलेली कार्यवाही | याबाबतची कागदपत्रे मा. कुलगुरु यांनी प्रमाणित करावी | ५ |
| १६ | राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने केलेली विशेष कार्यवाही | याबाबतची कागदपत्रे मा. कुलगुरु यांनी प्रमाणित करावी | ५ |
| १७ | मागील तीन वर्षातील वर्षनिहाय एपीआय (Academic Research Score) गुण (किमान ११०) सदरील एपीआय विद्यापीठाने प्रमाणित केलेला असणे आवश्यक आहे | याबाबतची कागदपत्रे मा. कुलगुरु यांनी प्रमाणित करावी | १० |

**ब)** महाविद्यालये /विद्यापीठ / अध्यापक महाविद्यालये /विज्ञान संस्था / न्याय सहाय्य विज्ञान संस्था /अभियांत्रिकी महाविद्यालये /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने येथील शिक्षकांकरीता डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कारासाठी निकष :

| अ.क्र. | निकष | मुल्यांकनाची पद्धती | गुणांकन |
|---|---|---|---|
| १. | शिक्षकाने त्याच्या विषयात शोध निबंध प्रकाशित केलेले असावेत | याबाबतची प्रमाणित कागदपत्रे प्रस्तावासोबत असावीत व तो कुलगुरुंनी प्रमाणित करावीत. | २० |
| २. | विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्या विकासाकरिता रार्वावलेले उपक्रम | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित कुलगुरु / संचालक प्रमाणित करतील. | २० |
| ३. | शिक्षकाच्या अध्यापन विषयातील विद्यार्थ्यांच्या उत्तीर्णतेचे मागील ५ वर्षातील प्रमाण (८०% जास्त असल्यासच गुण मिळतील) | सदर माहिती संबंधित विभागप्रमुख प्रमाणित करतील. | २० |
| ४. | पी.एच.डी. किंवा नेट-सेट उत्तीर्ण झालेले असल्यास, | याचाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित कुलगुरु / संचालक प्रमाणित करतील. | ०५ |
| ५. | किमान २ विद्यार्थ्यांना पी.एच.डी. मार्गदर्शक म्हणून काम केलेले असावे | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित कुलगुरु / संचालक प्रमाणित करतील. | ०५ |
| ६. | शिक्षकाने त्याच्या अध्यापनक्षेत्रामध्ये केलेले संशोधनपर कार्य, शोधनिबंध व त्याची प्रसिद्धी | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित कुलगुरु / संचालक प्रमाणित करतील. | १५ |
| ७. | आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सेमिनारमध्ये सादर / प्रसिद्ध केलेले संशोधनपर पेपर्स | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित कुलगुरु / संचालक प्रमाणित करतील. | १५ |

क) चित्रकला /उपयोजित कला महाविद्यालयातील शिक्षकांकरीता डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कारासाठी निकष :

| अ.क्र. | निकष | मुल्यांकनाची पद्धती | गुणांकन |
|---|---|---|---|
| १. | चित्रकला /उपयोजित कला विकासासाठी केलेले कार्य | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील. | ३० |
| २. | राष्ट्रीय / राज्यस्तरावर आयोजित कला प्रदर्शनात प्रदर्शित केलेली कला | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील | १५ |
| ३. | शिक्षकाच्या अध्यापन विषयातील विद्यार्थ्यांच्या कला क्षेत्रातील यशस्वीततेची उदाहरणे (मार्गदर्शन इ. अनुषंगाने) | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील. | १५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सेमिनारमध्ये प्रसिद्ध केलेले संशोधनपर पेपर्स | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील. | १० |
| ५. | स्वतःच्या विषयाशी संबंधित २ दर्जेदार कलासाहित्य प्रकाशित झालेले असावेत | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील. | १० |
| ६. | शिक्षक शिकवित असलेल्या कला विषयात विद्यार्थ्यांच्या प्रवेश क्षमतेनुसार सर्व प्रवेश होतात का? व प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी (गळती न होता) नियमित पदवी संपादन करुन बाहेर पडतात का? | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील. | १० |
| ७. | प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची गळती रोखण्यासंदर्भात तसेच कलेच्या प्रचार, प्रसारासाठी शिक्षकाने केलेली उल्लेखनीय कामगिरी | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील. | १० |

०६. प्राथमिक अटी व निकष यांचे पालन करणाऱ्या प्राचार्य / शिक्षकांनाच डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार देण्यात येतील. एखाद्या वर्षी प्राथमिक अटी व निकषांची पूर्तता होत नसल्यास, त्या वर्षी त्या प्रवर्गात पुरस्कार दिला जाणार नाही.

०७. डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कारासाठी प्रस्ताव तयार करण्याची पद्धती.

(एक) संचालक व विद्यापीठांचे कुलगुरु सदर पुरस्कार निवडीसाठी महाराष्ट्र राज्यातील वर्तमानपत्रात जाहिरात देऊन व त्यांच्या अधिनस्त सर्व क्षेत्रीय कार्यालयाकरीता परिपत्रक निर्गमित करुन, व्यापक प्रसिद्धी देतील आणि पुरस्कारासाठी अर्ज मागवतील.

(दोन) पुरस्कार इच्छुक प्राचार्य / शिक्षक अथवा एखाद्या शिक्षकाकरीता शिफारस करणाऱ्या संस्था त्यांचे प्रस्ताव, शासन निर्णयात विहित केलेल्या कार्यपद्धतीने तयार करुन, असे शिक्षक जेथे कार्यरत आहेत त्या शिक्षण संस्था प्रमुखांच्यामार्फत (प्राचार्य / संचालक इत्यादि) संबंधित विद्यापीठ आणि संचालक यांच्याकडे सादर करतील. तसेच, राज्यातील सर्व शासकीय पारंपारिक महाविद्यालये /अध्यापक महाविद्यालये / शासकीय शिक्षण संस्था येथील शिक्षकांचे प्रस्ताव, असे शिक्षक जेथे कार्यरत आहेत त्या शिक्षण संस्था प्रमुखांच्यामार्फत (प्राचार्य / संचालक इत्यादी) संबंधित विद्यापीठाकडे पाठवतील.

(तीन) प्रत्येक प्रस्ताव हा शिक्षकनिहाय स्वतंत्र राहील. प्रस्तावाच्या सुरुवातीची पृष्ठे, शिक्षकाची वैयक्तिक माहिती (उदा. शिक्षकाचे नाव, संस्थेचे नाव, जन्मतारीख (वय), शैक्षणिक पात्रता, प्रथम नियुक्तीचा दिनांक, सेवेचा कालावधी इत्यादिबाबतच्या कागदपत्राची राहतील. प्रस्तावात त्यानंतरची पृष्ठे शिक्षकाने प्राथमिक अटी पूर्ण केल्याची प्रमाणपत्रासह क्रमवार

कागदपत्रे असतील. प्रस्तावातील त्यानंतरची पृष्ठे त्या-त्या पुरस्काराकरीता जे निकष विहीत केलेले आहेत, त्याची पूर्तता आणि त्याबाबतची प्रमाणित कागदपत्राची असतील.

(चार) प्रत्येक संचालनालय आणि प्रत्येक विद्यापीठ यांच्याकडे प्राप्त होणारे सर्व प्रस्ताव, संचालक आणि विद्यापीठाचे कुलगुरु त्यांच्यास्तरावर गठीत करण्यात आलेल्या छाननी समितीपुढे ठेवतील व छाननी समिती तपासून, मुल्यांकन करील. विद्यापीठाकडे खालील तीन प्रकारचे प्रस्ताव येतील.

(१) प्राचार्यांचे प्रस्ताव,

(२) विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पारंपारिक महाविद्यालये (अनुदानित, विनाअनुदानित आणि खाजगी)

(३) विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील शासकीय महाविद्यालये, अध्यापक महाविद्यालये आणि शासकीय शिक्षण संस्था येथील शिक्षकांचे प्रस्ताव.

असे तिन्ही प्रकारचे प्रस्ताव, संबंधित कुलगुरु त्यांच्या स्तरावर गठित झालेल्या छाननी समितीपुढे स्वतंत्रपणे ठेऊन, स्वतंत्रपणे तपासून, मुल्यांकन करतील.

०८. छाननी समितीची रचना:-

संचालक व विद्यापीठ स्तरावर छाननी समिती खालीलप्रमाणे राहील. छाननी समिती गठीत करण्याची कार्यवाही संचालक आणि विद्यापीठ प्रत्येक वर्षी करतील.

**अ) प्राचार्य पुरस्कार प्रस्तावांची छाननी करण्यासाठी विद्यापीठ स्तरावरील छाननी समितीः-**

| अ.क्र. | समिती मान्यवर | पदनाम |
|---|---|---|
| १ | संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु | अध्यक्ष |
| २ | सबंधित विद्यापीठातील कोणत्याही एका विद्याशाखेचे अधिष्ठाता | सदस्य |
| ३ | विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) | सदस्य |
| ४ | विद्यापीठाचे कुलसचिव | सदस्य सचिव |

**आ) शिक्षक पुरस्कार प्रस्तावांची विद्यापीठ स्तरावरील छाननी समितीः-**

| अ.क्र. | समिती मान्यवर | पदनाम |
|---|---|---|
| १ | कुलगुरु | अध्यक्ष |
| २ | विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील नावाजलेल्या महाविद्यालयीन कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेचे प्राचार्य/विभागप्रमुख (प्रत्येकी-१) | सदस्य |
| ३ | विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) | सदस्य |
| ४ | विद्यापीठाचे कुलसचिव | सदस्य सचिव |

### इ) तंत्र शिक्षण संचालनालय, छाननी समिती :-

| अ.क्र. | समिती मान्यवर | पदनाम |
|---|---|---|
| १ | संचालक | अध्यक्ष |
| २ | संचालनालयाच्या कार्यक्षेत्रातील शासकीय विनाअनुदानित /अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रत्येकी एक नियमित प्राचार्य (फिरत्या पध्दतीने) | सदस्य |
| ३ | संचालक, वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था (व्हीजेटीआय), मुंबई | सदस्य |
| ४ | स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील एका महाविद्यालयाचे प्राचार्य (फिरत्या पध्दतीने) | सदस्य |
| ५ | संचालनालय (मुख्यालय) सहसंचालक (प्रशासन) | सदस्य सचिव |

### (ई) कला संचालनालय, छाननी समिती::-

| अ.क्र. | समिती मान्यवर | पदनाम |
|---|---|---|
| १ | संचालक | अध्यक्ष |
| २ | सर ज.जी. कला, वास्तुकला आणि अधिकल्प विद्यालय, मुंबई आणि शासकीय कला व अधिकल्प महाविद्यालय, नागपूर यांचे नियमित प्राचार्य | सदस्य |
| ३ | राज्यातील अनुदानित दोन कला महाविद्यालयाचे प्राचार्य | सदस्य |
| ४ | संचालनालय (मुख्यालय) मधील प्रशासन अधिकारी | सदस्य सचिव |

### ९. छाननी समितीचे कार्य आणि जबाबदारी:-

या शासन निर्णयात विहीत करुन दिलेल्या प्राथमिक अटी प्रत्येक प्रस्तावात पूर्ण झालेल्या आहेत याची तपासणी छाननी समिती करील. प्राथमिक अटी पूर्ण करणारे प्रस्ताव, असा प्रस्ताव ज्या पुरस्काराकरीता असेल, त्या पुरस्काराकरीता विहीत केलेल्या निकषांकरीता छाननी समिती विचारात घेईल. पुरस्कारासाठी निश्चित केलेले निकष, प्रस्तावात पूर्ण झालेले आहेत याची तपासणी छाननी समिती करील आणि सत्यता तपासून, या शासन निर्णयात विहित केलेल्या पद्धतीने प्रत्येक निकषाचे गुणांकन करुन, पुरस्काराची गुणवत्ता यादी छाननी समिती तयार करील. विद्यापीठाकडे प्राप्त होणारे, शासकीय पारंपारिक महाविद्यालये, अध्यापक महाविद्यालये आणि शासकीय शैक्षणिक संस्था येथील शिक्षकांच्या प्रस्तावांची गुणवत्ता यादी विद्यापीठ स्तरावरील छाननी समिती स्वतंत्रपणे करील. छाननी समितीने तयार केलेली पुरस्कारनिहाय गुणवत्ता यादी आणि छाननी समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त याची प्रत्येकी एक प्रत प्रत्येक वैयक्तिक प्रस्तावाच्या नस्तीत छाननी समिती ठेवील. छाननी करुन, गुणांकन केलेल्या प्रत्येक प्रस्तावाच्या दहा प्रती, राज्य निवडसमिती पुढे

ठेवण्याकरिता, प्रत्येक वर्षी शासनाकडे, छाननी समिती सादर करील. प्रत्येक प्रस्ताव Spiral Binding स्वरुपात राहील. दुसरी प्रत संचालक /कुलगुरु त्यांच्या दफ्तरी जतन करुन ठेवतील.

१०. वरीलप्रमाणे, विहीत केलेल्या निकषानुसार पुरस्कारासाठी पात्र असणाऱ्या प्रस्तावांची छाननी समितीव्दारे छाननी झाल्यानंतर, सदरहू प्रस्ताव अंतिम केंद्रीय छाननी समितीकडे सादर करतील.

**अंतिम केंद्रीय छाननी समितीः-**

| अ.क्र. | समिती मान्यवर | पदनाम |
|---|---|---|
| १ | कुलगुरु | अध्यक्ष |
| २ | संचालक, उच्च शिक्षण | सदस्य |
| ३ | संचालक, तंत्र शिक्षण | सदस्य |
| ४ | संचालक, कला संचालनालय | सदस्य |
| ५ | विषय तज्ञ - २ | सदस्य |
| ६ | सहसंचालक उच्च शिक्षण (मुख्यालय) | सदस्य सचिव |

**११. पुरस्काररर्थांची अंतिम निवड करण्याकरीता राज्य निवड समिती रचनाः-**

अंतिम केंद्रीय छाननी समितीद्वारे छाननी केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्काररर्थांची अंतिम निवड करण्यासाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरीय निवड समिती राहील -

**राज्यस्तरीय निवडसमिती**

| | | |
|---|---|---|
| १ | मा. मंत्री. उच्च व तंत्रशिक्षण | अध्यक्ष |
| २ | मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण | उपाध्यक्ष |
| ३ | मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग | सदस्य |
| ४ | राज्यातील दोन मान्यवर शिक्षण तज्ञ | सदस्य |
| ५ | सह/ उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | सदस्य |
| ६ | संचालक, उच्च शिक्षण | सदस्य-सचिव |

१२. डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार वेळापत्रक स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

१३. पुरस्काराचे स्वरुप : - पुरस्कार प्राप्त करणाऱ्या प्रत्येक पुरस्ककारर्थीना, रु.२५,०००/- रोख, शाल, श्रीफळ आणि राज्यस्तरीय समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र असे राहील.

१४. यासाठी होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

लेखाशिर्ष- मागणी क्र. डब्ल्यू-४, २२०५- कला व संस्कृती, ८००-इतर खर्च (०१) समित्या व समारंभ (०१)(०१) समित्या व समारंभ-०५ बक्षिसे (२२०५ ०४५८)”

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक २०२५०९०५१६२०५७६८०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

A S MUTYAL

Digitally signed by A S MUTYAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=daee80ec44e60c590272017d95394b0b605cfddee15c8895212ac4add74386f5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BEC50BCA597E7B3FD46D9282C52300269EB689D8C130253FCE76651562083F8B, cn=A S MUTYAL
Date: 2025.09.05 16:23:30 +05'30'

**(अ.शा.मुत्याल)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति.**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८.मा.महालेखापाल, (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
९. सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई (व्यापक प्रसिध्दीसाठी)
११ सर्व सहसचिव/ उपसचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत सर्व संचालनालयाचे संचालक
१३. अवर सचिव /कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवड नस्ती (समन्वय).

“डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार” निवड प्रक्रिया वेळापत्रक

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्र क्रमांक :- पुरस्का-२०२५/CN-१३१०६४२/प्र.क्र. ८९/ समन्वय**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १६ ऑक्टोबर, २०२५

**वाचा :-** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक :- पुरस्का-२०२५/CN-१३१०६४२/प्र.क्र. ८९/ समन्वय, दिनांक ५ सप्टेंबर, २०२५.

**शासन परिपत्रक-**

शासन निर्णय, दिनांक ५ सप्टेंबर, २०२५ नुसार, उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत विद्यापीठ / पारंपारिक व अभियांत्रिक महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि चित्रकला, उपयोजित कला येथील बहुमोल शैक्षणिक योगदान देणा-या प्राचार्य / शिक्षक यांना **“डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार”** प्रदान करणेबाबत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार, सन २०२४-२५ या वर्षापासून “डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार” प्रदान करण्यात येणार आहे.

**२. अ) <u>सन २०२४-२५ या वर्षासाठीचा “डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार” प्रदान करण्याकरीता निवड प्रक्रिया कार्यक्रम खालीलप्रमाणे कार्यक्रम निश्चित करण्यात येत आहे :-</u>**

| अ.क्र | कार्यक्रम | मुदत/कालावधी |
|---|---|---|
| १ | डॉ.जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार प्रस्ताव/अर्ज मागविण्यासाठी संचालक/कुलसचिव यांनी वर्तमानपत्रात जाहिरात देणे व सर्व क्षेत्रीय कार्यालयासाठी परिपत्रक निर्गमित करणे. | दि. २७ ऑक्टोबर, २०२५ |
| २ | प्रस्ताव प्राप्त करुन घेण्याची अंतिम तारीख | दि. ७ नोव्हेंबर, २०२५ |
| ३ | संचालक आणि कुलसचिव यांनी प्रा प्त प्रस्ताव / अर्ज शासन निर्णयातील प्राथामिक अटी तपासून, प्रमाणित करून प्राचार्य / शिक्षक निहाय प्रस्ताव तयार करून, छाननी समितीपुढे ठेवणे. | दि. १४ नोव्हेंबर, २०२५ |
| ४ | छाननी समितीने प्रस्ताव अंतिम केंद्रीय छाननी समितीकडे सादर करणे | दि.२५ नोव्हेंबर, २०२५ |
| ५ | अंतिम केंद्रीय छाननी समितीने प्रस्ताव शासनाकडे / राज्यस्तरीय निवड समितीकडे सादर करणे. | दि. ५ डिसेंबर, २०२५ पर्यंत |
| ६ | राज्यस्तरीय निवड समितीची सभा आयोजित करणे | दि. १२ डिसेंबर, २०२५ ते २० डिसेंबर, २०२५ दरम्यान |
| ७ | पुरस्कार जाहिर करणे. | दि. ३० डिसेंबर, २०२५ |

निवड प्रक्रीयेच्या वेळापत्रकानुसार कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर, सन २०२४-२५ च्या पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम निश्चित करण्यात येईल.

**ब) सन २०२५-२६ पासून "डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार" प्रदान करण्याकरीता निवड प्रक्रीया कार्यक्रम**

| अ.क्र | कार्यक्रम | मुदत/कालावधी |
|---|---|---|
| १ | डॉ.जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार प्रस्ताव/अर्ज मागविण्यासाठी संचालक/कुलसचिव यांनी वर्तमानपत्रात जाहिरात देणे व सर्व क्षेत्रीय कार्यालयासाठी परिपत्रक निर्गमित करणे. | दि.०१ जानेवारी |
| २ | प्रस्ताव प्राप्त करुन घेण्याची अंतिम तारीख | दि.३१ जानेवारी |
| ३ | संचालक आणि कुलसचिव यांनी प्रा प्त प्रस्ताव / अर्ज शासन निर्णयातील प्राथमिक अटी तपासून, प्रमाणित करून प्राचार्य / शिक्षक निहाय प्रस्ताव तयार करून, छाननी समितीपुढे ठेवणे. | दि.०१ मार्च |
| ४ | छाननी समितीने प्रस्ताव अंतिम केंद्रीय छाननी समितीकडे सादर करणे | दि.०१ एप्रिल |
| ५ | अंतिम केंद्रीय छाननी समितीने प्रस्ताव शासनाकडे / राज्यस्तरीय निवड समितीकडे सादर करणे. | दि.१ मे पर्यंत |
| ६ | राज्यस्तरीय निवड समितीची सभा आयोजित करणे | माहे जून दरम्यान |
| ७ | आदश राज्य शिक्षक पुरस्कार जाहिर करणे. | दि. १५ ऑगस्ट |
| ८ | आदश राज्य शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा. | दि.०५ सप्टेंबर |

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०२५१०१६१८४०५०६७०८ असा आहे. सदर शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

A S MUTYAL

Digitally signed by A S MUTYAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=daee80ec44e60c590272017d95394b0b605cfddee15c8895212ac4add74386f5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BEC50BCA597E7B3FD46D9282C52300269EB689D8C130253FCE76651562083F8B, cn=A S MUTYAL
Date: 2025.10.16 18:42:25 +05'30'

**(अमोल मुत्याल)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु
९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई (व्यापक प्रसिध्दीसाठी)
१० सर्व सहसचिव/ उपसचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत सर्व संचालनालयाचे संचालक
१२. अवर सचिव /कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवड नस्ती (समन्वय).
१३ महालेखापाल, (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
१४. निवडनस्ती (समन्वय)